# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( आस्थापना विभाग )**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था/९४९ /२०१९ दि. १०/०१/२०१९

# परिपत्रक

विषय :- गोंडवाना विद्यापीठात आयोजीत १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव 'अविष्कार-२०१८' कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत.

विद्यापीठाची विविध प्राधिकरणे, मंडळे व समित्यांचे सन्माननीय सदस्य, संस्थेचे अध्यक्ष/सचिव, दानदाते, प्राचार्य, अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संशोधक आणि विद्यार्थ्यांना कळविताना हर्ष होत आहे की, १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव **'अविष्कार - २०१८'** या महोत्सवाचे दिनांक १५ जानेवारी २०१९ ते १८ जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजन करण्यात येणार असुन अविष्कार - २०१८ या संशोधन महोत्सवाकरीता मुख्य अतिथी **मा. श्री. के. एन. व्यास**, Chairman, Atomic Energy Commission and Secretary, Department of Atomic Energy (Govt. of India) यांचे शुभ हस्ते उदघाटन सोहळा दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी दु. ३.०० वाजता पार पडणार आहे. सदरहु कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री. पी. आर. पाटील, Associate Director, Reactor Design & Development Group Bhabha Atomic Research Center हे उपस्थित राहणार आहेत. निमंत्रण पत्रिकेमध्ये उद्घाटन सोहळाची वेळ ३.३० वाजता देण्यात आलेली आहे . परंतु **मा. श्री. के. एन. व्यास, यांना अतिमहत्वाच्या कामानिमित्त परत जावयाचे असल्यामुळे उद्घाटन सोहळा अर्धा तास आधी ३.०० वाजता घेण्यात येत आहे**. तसेच अविष्कार - २०१८ चे दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० वा. समारोपीय कार्यक्रमाकरीता **डॉ. व्ही. एम. भाले,** मा. कुलगुरू, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदर उत्सवा दरम्यान महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी-अकृषी विद्यापीठातील अधिकारी तसेच अंदाजे १००० संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक या उत्सवामध्ये मोठया प्रमाणात सहभाग नोंदविणार आहेत.

आपणास नम्र विनंती करण्यात येते की, दिनांक १५ जानेवारी ते १८ जानेवारी २०१९ या कालावधीतील १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव 'अविष्कार - २०१८' सर्वांनी आवर्जुन उपस्थित राहावे.

धन्यवाद !

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
**कुलसचिव**

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषीत:-

१) मा. कुलगुरू चे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. प्राचार्य, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली